


दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१२ ■ शनिवार, दि. ८ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रुपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -312 ■ Saturday, 8 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## औरंगजेबाची कबर उखडून टाकावी; उदयनराजे

**सातारा (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना त्रास देणाऱ्या, छत्रपती संभाजी महाराजांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या या औरंगजेबाच्या कबरीचे या महाराष्ट्रात उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत हे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच उखडून टाकली पाहिजे असे मत छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.

अबू आझमी यांनी औरंगजेब याचे उत्तम प्रशासक असा गौरव केल्यानंतर राज्यात या वक्तव्याविरुद्ध पडसाद उमटत आहेत. हे वक्तव्याचा निषेध सुरू असतानाच औरंगजेब याच्या नावाने भरवल्या जाणाऱ्या उरुसाची चर्चाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर उदयनराजे माध्यमांशी बोलत होते. औरंगजेबाचे पूर्वज हे बाहेरून आलेले लुटारू, धर्मांध आणि आक्रमक असल्याचे सांगत उदयनराजे म्हणाले, की या औरंगजेबाने या देशातील प्रत्येक राजवटींना त्रास दिला, रयतेवर अत्याचार केले. धर्मांतरे घडवली. स्वतःच्या राजकीय



महत्वकांक्षेतून सख्ख्या भावांची त्याने हत्या केली, वडलांना कैदेत टाकले, इथली मंदिरे, देवांवर त्याने हल्ले केले, आमची संस्कृती नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो आणि त्याचे पूर्वज हे फक्त हा देश लुटण्यासाठी आले होते. त्यांनी इथला देव, देश आणि धर्म बुडवण्याचे काम केले. असा हा माणूस आमच्यासाठी आदर्श कसा होऊ शकतो ? छत्रपती शिवाजी महाराजांना ज्याने त्रास दिला, त्यांचा अपमान केला. छत्रपती संभाजी महाराजांची ज्याने अत्यंत निर्दयीपणे हत्या केली. असे असताना या क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर या महाराष्ट्रात कशाला हवी. उलट त्या जागी एका क्रूर व्यक्तीच्या शेवटची ही जागा असेच स्मरण करून द्यायला हवे.

असे असताना सध्या काहींकडून त्याचा गौरव होतो, त्याच्या कबरीचे उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत. हे सगळे महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायम चे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच महाराष्ट्रातून उखडून टाकली पाहिजे असे मत उदयनराजे यांनी व्यक्त केले. औरंगजेब आमच्या देशाचा, स्वराज्याचा, आमच्या राजांचा हा शत्रू होता. ज्यांचे कुणाचे औरंगजेबावर प्रेम असेल, ज्याला तिथे जाऊन डोके टेकवायचे असेल त्याने ही कबर घेत औरंगजेब, त्याचे पूर्वज जिथून आले तिथे चालते व्हावे.

औरंगजेबाचा गौरव करणाऱ्या पिलावळीने हे प्रकार थांबवावेत अन्यथा त्यांनी औरंगजेबाच्या मूळ देशात चालते व्हावे असा इशाराही उदयनराजे यांनी या वेळी दिला. दरम्यान महापुरुषांविषयी वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्याविरोधात तातडीने कायदा करण्याच्या मागणीचाही उदयनराजे यांनी पुनरुच्चार केला.यावेळी सुनील काटकर, काका धुमाळ, प्रीतम कळसकर, विनीत पाटील आदी उपस्थित होते.

## मुंबईत पत्नीला वैतागून ४१ वर्षीय पतीची आत्महत्या

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईतील एका हॉटेलमध्ये ४१ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली. आत्महत्या करणाऱ्याचे नाव निशांत त्रिपाठी असे आहे. पत्नी आणि तिच्या मावशीच्या छळाला वैतागून निशांत त्रिपाठीने हे टोकाचे पाऊल उचलले. आत्महत्या करण्याआधी निशांतने तो ज्या कंपनीत नोकरी करत होता त्या कंपनीच्या वेबसाईटवर एक पत्र अपलोड केले. या पत्रात त्याने आत्महत्येचे कारण नमूद केले आहे. तसेच निशांतने आत्महत्या करण्याआधी लिहिलेल्या पत्रातून, 'माझ्या आईपासून दूर राहा' अशी विनंती पत्नी अपूर्वा पारिख त्रिपाठी आणि तिची मावशी प्रार्थना मिश्रा या दोघींना केली आहे.

निशांतने मुंबईतील हॉटेलची खोली बुक केली होती. याच खोलीतून त्याने कंपनीच्या वेबसाईटवर आत्महत्येचे कारण नमूद केलेले पत्र अपलोड केले. यानंतर खोलीतच त्याने गळफास घेतला. लवकर कोणाला कळू नये यासाठी हॉटेलच्या खोलीत प्रवेश करतानाच त्याने दरवाजावर 'डू नॉट डिस्टर्ब' अशी पाटी लावली होती. हॉटेलमध्ये आत्महत्या झाल्याचे उघड झाल्यावर पोलिसांनी निशांतची पत्नी अपूर्वा पारिख त्रिपाठी आणि तिची मावशी प्रार्थना मिश्रा या दोघींविरोधात आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. अद्याप कोणालाही पोलिसांनी अटक केलेली नाही. या प्रकरणात तपास सुरू आहे.

हॉटेलच्या विशिष्ट खोलीतून अनेक तासांपासून कोणी बाहेर आलेले नाही आणि तिथून एकही ऑर्डर आलेली नाही हे बघून व्यवस्थापनाने स्वतःकडे असलेल्या चावीचा वापर करुन खोलीत प्रवेश केला. खोलीत शिरताच हॉटेलच्या कर्मचाऱ्याला निशांत बाथरुममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. ही घटना २८ फेब्रुवारी २०२५ रोजी घडल्याची नोंद पोलिसांकडे आहे.

## भयानक! विठुरायाच्या पंढरीत तब्बल १४७ किलो गांजासह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कारमधून १४७ किलो गांजासह ४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई भटुंबरे (ता. पंढरपूर) परिसरातील अहिल्यादेवी चौकात करण्यात आली. याप्रकरणी माळशिरस तालुक्यातील तिघांविरोधात पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

गुरसाळेकडून (ता. पंढरपूर) पंढरपूरच्या दिशेने येणाऱ्या एका कारमध्ये गांजा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी अहिल्यादेवी चौकात नाकाबंदी केली. नाकाबंदी कारवाईवेळी गुरसाळेतून अहिल्यादेवी चौकात एक संशयित कार पोलिसांनी अडवली.

वाहनाच्या तपासणीप्रसंगी त्या वाहनातील प्रदीप दत्तात्रय हिवरे (वय २०, रा. पुरंदावडे, ता. माळशिरस) याच्याकडे विचारपूस केली. या कारमध्ये आंबट उग्र वासाचा तीन पोती गांजा ७२ पाकिटांमध्ये पॅक करण्यात आलेला १४७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा व कार (एमएच १२-एचव्ही ५६६६) असा एकूण ४० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

## कोयत्याचा धाक दाखवून लुटमार करणारी 'कोयता गँग' जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संगमनेर : संगमनेरमधील कोयता गँगला पोलीस उपाधीक्षक कुणाल सोनवणे यांच्या पथकाने कोयत्यासह घातक शस्त्रांचा धाक दाखवून दहशत निर्माण करत लूटमार करणाऱ्याना पकडले आहे. पकडलेल्या पाच आरोपींमध्ये दोघा अल्पवयीन आरोपींचा समावेश असून त्यांच्याकडून घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.गणेश बबन कुरकुटे (वय २३), सार्थक उल्हास कुरकुटे (वय २०) व प्रथमेश शांताराम दुधवडे ( वय १९, सर्व रा. कुरकुटवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर ) अशी पोलिसांनी पकडलेल्या आरोपींची नावे असून यांच्यासह दोन अल्पवयीन मुलांचा आरोपीमध्ये समावेश आहे. आरोपींना न्यायालयाने शुक्रवार पर्यंत पोलीस कोठडी दिली असून आरोपींकडून आणखी गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये बहुचर्चित आणि धुमाकूळ घालणाऱ्या कोयता गँगची सर्वत्र दहशत निर्माण झाली असताना याच पार्श्वभूमीवर या आरोपींना संगमनेरमध्ये देखील आपली दहशत निर्माण करण्याचा या माध्यमातून प्रयत्न केला असल्याचे समोर येत आहे.१५ जानेवारीला रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घराबाहेर सांडपाणी टाकण्यासाठी गेलेल्या महिलेला चार अनोळखी लोकांनी कोयत्याचा धाक दाखवून महिलेच्या गळ्यातील मनी मंगळसूत्र तसेच तिच्या भावजयीला देखील या गँगने कोयत्याचा धाक दाखवत मनी मंगळसूत्र, कानातील वेल बळजबरीने काढून पळून गेले होते. याशिवाय पांडुरंग माधव ढेरंगे यांच्या गळ्यातील चैन, त्यांच्या पत्नीचे मिनी गंठण आणि आईच्या गळ्यातील मनी मंगळसूत्र, कानातील सोन्याचे दागिने काढून हे आरोपी पसार झाले होते.या संदर्भात घारगाव (संगमनेर) पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.

घारगाव पोलीस आरोपींचा शोध घेत होते मात्र त्यांना आरोपींचा ठावठिकाणा लागत नव्हता. संगमनेरचे पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे यांनी आपल्या पथकाला या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पथकातील पोलीस नाईक राहुल डोके, पोलीस कॉन्स्टेबल राहुल सारबंदे, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद चव्हाण व पोलीस कॉन्स्टेबल अनिल उगले आरोपींच्या मागावर होते.कोयत्याच्या सहाय्याने दहशत माजवत लूटमार करणारी काही जणांची टोळी संगमनेर तालुक्यातील कुरकुटवाडी येथे असल्याची माहिती पोलीस उपाधीक्षकांना मिळाली होती. त्यानंतर उपाधीक्षकांनी तातडीने आरोपींना पकडण्यासाठी आपले पथक कुरकुटवाडी येथे पाठविले होते. या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे पाच जणांना पकडले असून त्यात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. चौकशीमध्ये आरोपींनी घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या दोन गुन्ह्यांची कबुली दिली असून या आरोपींकडून आणखीही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस उपाधीक्षक कुणाल सोनवणे यांनी व्यक्त केली आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे,पोलीस उपाधीक्षक डॉ.कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक राहुल डोके, पोलीस कॉन्स्टेबल राहुल सारबंदे, प्रमोद चव्हाण व अनिल उगले यांच्या पथकाने केले आहे.

## गॅस सिलिंडरच्या स्फोटात ५५ वर्षीय दिव्यांगाचा मृत्यू

**सोलापूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

घरगुती गॅस सिलिंडचा स्फोट होऊन घराला लागलेल्या आगीत संसारोपयोगी साहित्य व छप्पर जळून घरातील दिव्यांग व्यक्तीचा भाजल्याने मृत्यू झाला. ही घटना काल रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास जेऊर (ता. अक्कलकोट) शिवारातील वस्तीवर घडली. घटनेची अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे.

इरण्णा मलकप्पा म्हेत्रे (वय ५५, रा. गौडगाव, ता. अक्कलकोट) असे मृताचे नाव आहे. रेवणसिद्ध मलकप्पा म्हेत्रे (वय ४५, रा. गौडगाव बु, ता. अक्कलकोट) यांनी पोलिसांना सांगितले की ते कुटुंबासह जेऊर शिवारातील शेतात राहण्यास आहेत. इरण्णा मलकप्पा म्हेत्रे हा दिव्यांग होता.

बुधवारी रेवणसिद्ध म्हेत्रे नेहमीप्रमाणे शेतातील लिंबू तोडून बाजारात जाऊन विकून परत आले होते. त्यानंतर जेवण करून घरी झोपले होते. साधारण रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुम ारास भावाचे वस्तीकडे मोठा आवाज आल्याने व आरडाओरड होत असल्याने रेवणसिद्ध म्हेत्रे यांना जाग आली. तेव्हा त्यांनी चुलत भाऊ गुरुशांत गणपती म्हेत्रे, प्रशांत महांतेश माळी यांना सोबत घेऊन भाऊ इरण्णा मलकप्पा म्हेत्रे याचे वस्तीकडे गेले.

## शिवरायांचा अवमान करणाऱ्या भाजपा खासदाराला अटक का नाही? राऊतांचा व्हिडीओ शेअर करत संतप्त सवाल

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

समाजवादी पार्टीचे नेते आणि मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार अबू आझमी यांनी मुघल शासक औरंगजेबाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर मोठा वाद झाला होता. विधानसभेत झालेल्या गोंधळानंतर त्यांचे निलंबन देखील करण्यात आले. 'औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता' असं वक्तव्य अबू आझमी यांनी केले होते. दरम्यान याच मुद्द्यावर आता शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी सत्ताधारी पक्षांना काही प्रश्न विचारले आहेत. शिवरायांचा अपमान करणाऱ्या भाजपाच्या नेत्यांना वेगळा कायदा आहे का? असा थेट सवाल संजय राऊत यांनी विचारला आहे.

भाजपाचे नेते आणि राज्यसभा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी काही दिवसांपूर्वी शिवरायांबद्दल वादग्रस्त विधान केले होते, यानंतर मोठा गदारोळ झाला होता. या पार्श्वभूमीवर संजय राऊतांनी सुधांशु त्रिवेदी यांच्या त्या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडिया प्लॅटफफॉर्म एक्सवर शेअर केला आहे. तसेच त्यांनी सुधांशु त्रिवेदी यांच्यावर देखील अबू आझमी यांच्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे असे म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांना अटक का झाली नाही असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये राऊतांनी अबू आझमी यांच्यावर झालेल्या कारवाईबद्दल आनंद व्यक्त केला आहे. ङ्गअबू आझमी वर कारवाई झाली! एकदम कडक! मस्त! पण छत्रपती शिवाजी राजांना माफीवीर म्हणणाऱ्या या अतिशहाण्या भाजपा खासदारावर गुन्हा दाखल करून अटक का झाली नाही?,ङ्ग असे राऊत म्हणाले आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही! कोरटकर, सोलापुरकर आणि या सुधांशू त्रिवेदी सारख्यांना देखील आझमीचा न्याय का नाही? शिवरायांचा अपमान करणाऱ्या भाजपा वाल्यांना वेगळा कायदा आहे काय?,ङ्ग असेही राऊत म्हणाले आहेत.

खासदार संजय राऊत यांनी अन्सर इम्रान एसआर नावाच्या वापरकर्त्याने केलेली पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये या वापरकर्त्याने सुधांशू त्रिवेदी यांच्या त्या वादग्रस्त विधानाचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. ज्याला त्यांनी कॅप्शन दिले आहे की, ङ्गजर औरंगजेबावर बोलल्याने अबू आसिम आझमी यांच्या आमदारकीवर तलवार लटकू शकते आणि त्यांच्या अटकेची चर्चा होऊ शकते तर त्याआधी सत्ताधारी भाजपाचे राजसभा सदस्य सुधांशु त्रिवेदी यांच्यावर खटला दाखल व्हावा.

आझमी काय म्हणाले होते?

महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आझमी यांनी औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे वक्तव्य केले होते. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी औरंगजेबाचा वाद धार्मिक नव्हता तर राजकीय वैमनस्यातून त्यांची हत्या झाल्याचे वक्तव्य आझमी यांनी केले होते.

आझमी यांच्या या वक्तव्यावर सत्ताधारी आणि विरोधकांनीही तीव्र आक्षेप घेत कारवाईची मागणी केली होती. सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी मंगळवारी आझमी यांच्यावर निलंबन आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करीत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज बंद पाडले होते. त्यानंतर आझमी यांनीही आपले वक्तव्य मागे घेत छत्रपती संभाजी महाराजांच्या अवमानाबद्दल माफी मागितली.

## ...तर लोकांचा तुमच्यावरचा विश्वास उडेल

छत्रपती शिवाजी महाराज किंवा छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर कुठेतरी काही वक्तव्य केलं जातं, त्या ठिकाणी दुसरा देखील विचार केला पाहिजे. काही ठिकाणी दंगली घडतात. तेढ निर्माण होतो. त्यामध्ये अनेकांचा मृत्यू होतो. पण हे सर्व थांबण्याचं काम फक्त सत्ताधारी यांचं आणि विरोधकांचं काम नाही, तर महाराष्ट्रातील सर्व लोकप्रतिनिधी आहेत त्या सर्वांचं हे काम आहे. महाराष्ट्र सरकारने यासाठी याच अधिवेशनात विशेष कायदा पारित करावा. ही मागणी मी संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्यावतीने करत आहे. हा कायदा केला पाहिजे, नाही केला तर गोंधळ होतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी आणि मंत्र्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. सभागृहात देखील याच विषयावरून गोंधळ होतो ना? मग हा गोंधळ बंद करा आणि हा कायदा पारित करा. हा कायदा पारित केला नाही तर महाराष्ट्रातील लोक तुम्हाला माफ करणार नाहीत', असा इशारा खासदार उदयनराजे भोसले यांनी दिला.

# ‘महीला सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित’

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे. देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा ‘म हीलांपासुनच‘सर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना ‘संस्कृतीचा‘पाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे. त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर, नर्स,पायलट, वकील,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे.म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर,अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या, आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही.महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे.भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने ‘फास्ट ट्रॅक‘कोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. ‘महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत‘ तेव्हाच खाअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल. मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो.ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे.तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि म हीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये ‘तारीख पे तारीख‘असा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा ‘संकल्प‘केला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्म ान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल. म्हणूनच म्हणतात ‘बेटी बचाव बेटी पढाव‘. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे. आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे.यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते.असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे. यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. जय हिंद!

# जगी एका स्त्रीविना: घरांगण सुना सुना

**भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. ‘यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!‘ या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो. अशी आपबिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांनी व्यक्त केली आहे... संपादक**

### मार्च: आंतरराष्ट्रीय महिला दिवस सप्ताह विशेष

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संपूर्ण विश्वाच्या पाठीवर इ.स.१९११ साली पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला होता. तथापि सन १९१०च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. ‘यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!‘ या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो.

घरात जोपर्यंत स्त्रीचा वावर असतो, तोपर्यंतच त्या घरास घरपण असते. म्हातारे लोक म्हणतात त्याप्रमाणे ती देवता- लक्ष्मीच असते. त्या घरात तिच्या सहवासाने जीवंतपणा, शांती, प्रेम, वात्सल्य, दया, नम्रता, हे दैवी गुण ठासून असतात. स्त्रीविरहित घर एकप्रकारचे स्मशान असते. कोरोनाच्या जबरदस्त प्रादुर्भावात सन २०२१मध्ये माझी प्रेमळ पत्नी- आशाताई मरण पावली आणि माझ्या घराची आण, बाण व शान पुरती धुळलि मिळाली. कोना न कोना प्रसन्न वाटणारा तेव्हा अडगळ भासू लागला. सगेसोयरे, शेजारी व समाज यांच्या दरम्यान प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. त्यांचे पाहुणे म्हणून येणे, बसणे, ऊठणे, हसणे, खिदळणे, बागडणे सारे काही हराम झाले. ‘अतिथी देवो भवः!‘ या सुवर्ण क्षणासाठी मन आतुर होऊ लागले.

ती माऊली गेल्यापासून घरातील शीतल साऊलीच हरपली, असे वाटत होते. घरात एका पाठोपाठ एक असे चार मांजरीचे पिल्लू पाळून पाहिले, मात्र तीनचार-तीनचार महिन्यांच्या अंतराने बिचारे मरतच गेले. आपणच महापातकी आहोत की काय? अशी अपराधीपणाची भावना मनात घर करून बसली आहे. घराच्या वळचणीत, खिडकीत किंवा विजेच्या तारांवर आपले घरटे बांधून रोज आनंदाने चिवचिवाट करणारी चिमणीही तेव्हा दिसेनाशी झाली होती. घरात इकडून तिकडे व तिकडून इकडे दिवसात कितीतरी चकरा मारणारी चिचुंद्री पण दिसेल तर शप्पथ! इतका मोठ्ठा फरक आपण त्या घटकेला अनुभवला आहे, हे पांढऱ्या शुभ्र स्पटिकाप्रमाणे सत्य आहे. नेहमी ये-जा करत असणारे आपले अत्यंत काळजीवाहू नातलगसुद्धा ही स्मशान शांतता अनुभवत होते. एवढा फरक काही काळ- दोन वर्षे घरात एकही स्त्री नसल्याने पडलेला दिसला. यावरून आपण सूज्ञ वाचक स्त्रीचे श्रेष्ठत्व मोठे किती? कसे? आणि का? याचा अंदाज अवश्य बांधू शकाल, यात तिळमात्रही शंका नाही!



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

घरातली क्षुल्लकशी वाटणारी धुणे, भांडी, झाडलोट, स्वयंपाक, पाणी, आदी कामे उरकताना आपल्याला तारेवरची कसरत करावी लागत होती. घरबांधणी, घराची मालकी, राशनकार्ड, स्वयंपाकाचे गॅस कनेक्शन आधी सगळी जडावजड जबाबदाऱ्या तिने लिलया पेलल्या होत्या. खरे तर हे सगळे करताना आम्हास रडू कोसळत होते आणि ३३ कोटी देव आठवू लागले होते. वेळेवर आम्ही बापलेक अंघोळ, स्वयंपाक, जेवण, कपडे धुणे कधी केले काय नि कधी ना केले काय? विचारतो तरी कोण? नेहमीचा ‘अंघोळ करा, जेवण करा...‘ असा कळवळ्याचा सज्जड दम विरला होता. काळ्याकुट्ट अंधारातही काना न कोपऱ्यातील चकाकणाऱ्या वस्तू राहू द्या, परंतु लख्ख सूर्य प्रकाशातील अंगण तर ‘सद्या घरात सर्व माणसे मृतप्राय शरीरेच‘ असल्याची स्पष्ट साक्ष देत होते. घराचे घरपण, घरसजावट किंवा घरांगण स्वच्छता आदी एका स्त्रीजातीशिवाय शेकडो माणसेही पाहिजे तशी ठेवू शकत नाहीत. हे आज आपण पावन आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्त प्रामाणिकपणे मांडणे, आपले अहोभाग्य समजतोय! मागील वर्षी दि.१० फेब्रुवारी २०२३ रोजी मुलगा- इंजि.दुर्वांकुर यांचा विवाह उरकून सून- पल्लवीताई लक्ष्मीच्या पावलाने घरात आली आणि आमचा जीव भांड्यात पडला. आता खुप प्रसन्न वाटत आहे. तिनेही गृहलक्ष्मीची समस्त जवाबदारी आता समर्थपणे पेलून धरली आहे, हे येथे मला अभिमानाने नोंदवावे लागत आहे.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. दि.८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे सन १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले, तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, शाळा, महाविद्यालय व अन्य कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा होऊ लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होताना दिसून येतो. इ.स.१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले.

सन १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा, असे आवाहन का बरे केले असावे? क्रांतिसूर्य जोतीबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदींनी स्त्रीमुक्ती चळवळीत स्वतःला का समर्पित केले? याचे कोडे आज आपल्याला उलगडले आहे, हे पुनः पुन्हा सांगणे न लगेच!

!! जागतिक महिला दिनाच्या सर्व भगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# महिला सुरक्षेचा प्रश्न कधी सुटणार?

**अलीकडे** पुण्यामध्ये गुन्हेगारी बरीच वाढली आहे. येथील शिवशाही बसमधील कथित अत्याचार प्रकरणामुळे संपूर्ण राज्य हादरले. २०२२ मध्ये देशभरातील न्यायालयांमध्ये अत्याचारासंबंधित तब्बल दोन लाख प्रकरणे प्रलंबित होती. पैकी यामध्ये साडे १८ हजार प्रकरणात ट्रायल पूर्ण होऊन पाच हजार प्रकरणांमध्येच दोषींना शिक्षा दिली गेली, तर १२ हजारहून जास्त प्रकरणांमध्ये आरोपी निर्दोष सुटले. काय सांगते ही आकडेवारी?

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकावरून दररोज एक लाख प्रवासी प्रवास करतात. दक्षिण महाराष्ट्र, कोकण, मुंबई, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावांशी, जिल्ह्यांशी आणि तालुक्यांशी स्वारगेट बसस्थानकातून गाड्या सुटतात आणि येतात. अशा मध्यवर्ती आणि गजबजलेल्या बसस्थानकावर एवढे सुरक्षारक्षक, एसटी कर्मचाऱ्यांचा वाढता वावर आणि जवळच पोलीस ठाणे असताना एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षांच्या तरुणीवर एकदा नव्हे तर दोनदा अत्याचार करण्यात आला. हे प्रकरण माध्यमांनी उचलून धरल्यानंतर प्रशासन हलले, काही उपाययोजना केल्या; परंतु शिवशाहीमध्ये अत्याचार करणाऱ्या या आरोपीवर अनेक गुन्हे दाखल आहेत. नगर जिल्ह्यातील सुपे, शिरूर, शिक्रापूरसह अन्य ठिकाणी त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. महिलांची लूट, दरोडा आदी गुन्हे दाखल असताना तो जामिनावर बाहेर येतो, न्यायालयीन प्रक्रियेत आरोपांची सिद्धता न झाल्याने त्याला गुन्हे करण्याची संधी मिळते. गुन्हे दाखल झालेला दत्तात्रय गाडे तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवतो, यासारखा जगात दुसरा विनोद नाही. गाडे हा सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात दिसून आले. त्याने अत्याचाराच्या या घटनेव्यतिरिक्तही काही मुलींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यासाठी तो आपण पोलीस असल्याचे भासवायचा. त्याच्या संपर्कामध्ये आलेल्या राजकीय व्यक्ती आणि पोलीस कर्मचाऱ्यांकडे चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र या घटनेनंतर महिला सुरक्षिततेच्या गंभीर मुद्द्याचे काही नवे पैलू प्रकाशात आले आहेत.

गाडेवर आत्तापर्यंत सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गाडे स्वारगेट बसस्थानकावर वारंवार जात असायचा. त्यामुळे त्याला परिसरातील पूर्ण माहिती होती. त्याचाच फायदा घेऊन त्याने पीडित तरुणीला बसस्थानकावरील निर्जन स्थळी घेऊन जाऊन अत्याचार केला. स्वारगेट बसस्थानकावर महिला, मुलींची छेडछाड होत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही पोलिसांकडे येत होत्या. त्या त्या वेळी गस्त घालून, संशयितांची चौकशी करून त्यांना हाकलून देण्यात येत होते; मात्र यावेळी संबंधित मुलगी एकटी असल्याचा आणि अंधाराचा फायदा घेत नराधम आरोपीने अत्याचार केले. गाडे याच्या एका मैत्रिणीला भोरवरून चौकशीसाठी पुण्यात आणण्यात आले. त्यावेळी तिने पोलिसांना धक्कादायक माहिती दिली. तिच्या उत्तरातून गाडेने महिलेवर अत्याचार केल्याची ही पहिलीच घटना नसावी, यापूर्वीही त्याने महिलांना त्रास दिला असावा, असा संशय आहे. त्या दृष्टीने पोलीस आता तपास करत आहेत. गुन्हे शाखेने गाडे याच्या दहा मित्र-मैत्रिणींची चौकशी केली. या सगळ्यांकडून त्याच्याबद्दल खडानखडा माहिती पोलिसांनी काढून घेतली आहे.

‘पीएमपी’, ‘एसटी’ स्थानकांवर रेंगाळत, आपण पोलीस असल्याचे भासवून महिला, तरुणींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न तो करायचा. स्वारगेट बसस्थानकावर घडलेल्या घटनेनंतर प्रशासनाला जाग आली. सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आले. आगारप्रमुख आणि स्थानक प्रमुखांवरची कारवाई ही पश्चातबुद्धी आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून काही गर्दुले बसचा वापर लॉज म्हणून करत असल्याचा प्रकार उघड झाला. या गुन्ह्यानंतर पुणे शहरातील शिवाजीनगर बस स्थानक, स्वारगेट बस स्थानक, नाशिक, नागपूर तसेच अन्य स्थानकांमध्ये पाहणी केली गेली, तेव्हा अनेक भागात वीजपुरवठा बंद असल्याचे आढळले. घटना घडून २४ तासही होत नाही तोच पुन्हा दिव्याखाली अंधार असे चित्र पाहायला मिळाले. स्वारगेटमध्ये तिकीट काउंटरच्या ठिकाणी वीजच नव्हती. महिलांना भीती वाटत होती. त्याच बाजूला अनेक पुरुष झोपलेले पाहायला मिळाले. तिथेही अजिबात प्रकाश नव्हता. स्वारगेट बस स्थानकामध्ये ज्या गाडीत घटना घडली, त्या गाडीच्या बाजूला पोलिसांनी बंदोबस्त दिला होता. जिथे बस उभी होती, त्या ठिकाणीही वीज नव्हती. एसटीचे सुरक्षारक्षक नव्हते; मात्र पोलीस कर्मचारी घटना घडलेल्या गाडीला पहारा देत होते. त्याचबरोबर ते लोकांची विचारपूसही करत होते. स्वारगेट डेपोमध्ये गर्दुल्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. हे गर्दुल्ले पाहून महिला भयभीत झाल्याचे पाहायला मिळते.

पुण्याच्याच दुसऱ्या मोठ्या शिवाजीनगर बस स्थानकामध्येही पाहणी केली गेली. तेव्हा एकही पोलीस अथवा सुरक्षारक्षक दिसला नाही; मात्र मोठ्या प्रमाणावर गर्दुल्यांचा वावर दिसला. शिवाय स्थानकातल्या अनेक भागांमध्ये अंधार होता. शिवाजीनगर बस आगाराच्या बाहेर असणाऱ्या मोकळ्या जागेत प्रवासी झोपलेले दिसले. तिथला हिरकणी कक्ष बंद होता. पोलीस मदत केंद्रही नव्हते. देशात अत्याचाराच्या घटनांमध्ये ९६ टक्के आरोपी हे महिलांच्या ओळखीतील कोणी तरी असतात. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये शंभरपैकी २७ आरोपींनाच शिक्षा होते. बाकी सुटून जातात. ‘नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरो’ (एनसीआरबी) च्या आकडेवारीत ही माहिती समोर आली. या आकडेवारूनुसार भारतात वर्षभरात महिलांविरोधात चार लाखांहून अधिक गुन्हे दाखल केले जातात. या गुन्ह्यांमध्ये अत्याचारच नाही, तर छेडछाड, हुंडाबळी, अपहरण, ट्रॅफिकींग, ॲसिड ॲटक यासारख्या गुन्ह्यांचाही समावेश आहे. देशात कठोर कायदे आणि शिक्षेची तरतूद केल्यानंतर महिलांविरोधातील गुन्हे कमी होत नाहीत. या रिपोर्टनुसार २०२२च्या अखेरपर्यंत देशभरातील कोर्टात अत्याचारासंबंधी तब्बल दोन लाख प्रकरणे प्रलंबित होती, २०२२ पैकी यामध्ये

पान ३ वर

# शेख हबीब शेख सांडू यांची अँटी करप्शन बोर्ड, नवी दिल्ली येथे नेमणूक



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



शेंद्रा (क.) येथील सामाजिक कार्यकर्ते शेख हबीब शेख सांडू यांची अँटी करप्शन बोर्ड, नवी दिल्ली येथे मायनॉरिटी सेल जिल्हा अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

हा बोर्ड मिनिस्ट्री ऑफ जस्टीस, एम्प्लॉयमेंट आणि नीती आयोग, भारत सरकार यांच्या अंतर्गत कार्यरत आहे. त्यांची नियुक्तीचे पत्र दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी प्राप्त झाले आहे. त्यांच्या या नेमणुकीबद्दल गावात आनंदाचे वातावरण असून, गावकऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी गावचे उपसरपंच सर्जेराव पाटील कचकुरे, माजी सरपंच ॲड. रमेश जाधव, वैजनाथ मुळे, कुंडलिक कचकुरे यांनी शेख हबीब यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक अफसर शेठ बाबा पठाण, कल्याण आप्पा कचकुरे, मनोज कचकुरे, किशोर शेजुळ, विजय नाईकवाडे, भाऊसाहेब चौधरी, रावसाहेब काकडे, पांडुरंग कचकुरे, नामदेव कचकुरे, शंकर नाईकवाडे, नजीर भाई शेंद्रेवाले, समीर शेख, रशीद टेलर, जावेद पठाण, मुन्नाभाई शेख, नवनाथ पाटील कचकुरे, कल्याण शेंडी यांची उपस्थिती होती. गावकऱ्यांनी शेख हबीब शेख सांडू यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# भिमटेकडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर १०० बेड हॉस्पिटलच्या ओपीडीचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



येथील भिमटेकडी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर १०० बेड हॉस्पिटलच्या नवीन इमारतीत ओपीडी विभागाचे उद्घाटन करण्यात आले. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री मा. संजयजी शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटनाचा सोहळा पार पडला.

यावेळी संयोजिका पु. प्राध्यापिका भिक्खूनी धम्मदर्शना महाथेरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

उद्घाटन सोहळ्यास पु. भिक्खू खेमो धम्मोजी महाथेरो, पु. भिक्खूनी संघशीला नागपूर, पु. भदंत संगपाल थेरो आणि संपूर्ण भिख्खू संघ उपस्थित होता. या ओपीडीच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समताधिष्ठित आरोग्यदृष्टीचा विस्तार होण्यास मदत होईल, असे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

# सामूहिक विवाहाच्या मंगल क्षणांनी उजळणार गरजूंचे जीवन




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथे आर्थिक अडचणींमुळे विवाहासारख्या महत्त्वाच्या सोहळ्यापासून आर्थिक अडचणींमुळे वंचित राहणाऱ्या कुटुंबांसाठी 'जायंट्स पायोनियर्स सामूहिक विवाह सोहळा - २०२५' आशेचा किरण बनून आला आहे. जायंट्स ग्रुप ऑफ पायोनियर्स यांच्या पुढाकाराने, त्याचप्रमाणे अग्रवाल समाज आणि वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या सहकार्याने १८ एप्रिल २०२५ रोजी हा विवाह सोहळा आयोजित केला जाणार आहे. आर्थिक अडचणींमुळे विवाहासारख्या स्वप्नांपासून दूर राहणाऱ्या जोडप्यांसाठी हा सोहळा केवळ एक विवाह नसेल, तर त्यांच्या नव्या आयुष्याची प्रेरणादायी सुरुवात असेल.




समाजातील अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे आपल्या मुला-मुलींच्या विवाहाचा खर्च करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत, 'जायंट्स पायोनियर्स सामूहिक विवाह सोहळा' त्यांच्यासाठी एक वरदान ठरला आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याला केवळ विवाह सोहळ्याचा आनंदच मिळणार नाही, तर त्यांच्या नव्या संसारासाठी ५१,००० रुपये किमतीचे गृहउपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार आहे. हा सोहळा म्हणजे केवळ दोन जीवांचं मिलन नाही, तर दोन कुटुंबांचं आणि समाजाचे एकत्रीकरण आहे. या सोहळ्यासाठी ज्यांचे लग्न जुळले आहे असे जोडपे ज्यामधे मुली चे वय किमान १८ वर्ष आणि मुलाचे २१ वर्ष असेल अशा लग्न जुळलेल्या जोडप्यांची नोंदणी ५ एप्रिल २०२५ पर्यंत सुरू आहे. इच्छुकांनी त्वरित नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. नोंदणीसाठी नितिन मालाणी (९९७०४२४६८६) आणि विनोद अग्रवाल (९७६३२१८७९१) यांच्याशी संपर्क साधता येईल. या सामूहिक विवाह सोहळ्याद्वारे केवळ विवाहच होणार नाही, तर सामाजिक बांधिलकीचे एक सुंदर उदाहरण समाजासमोर ठेवले जाणार आहे. समाजातील गरजू कुटुंबांना आधार देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळवून देणे, हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे. या मंगलकार्यात सहभागी होऊन गरजू कुटुंबांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जायंट्स ग्रुप ऑफ पायोनियर्स हा ३५ तरुण जोडप्यांचा उत्साही गट आहे. ही एक सामाजिक संस्था आहे जी जायंट्स वेलफेअर फाउंडेशनशी जोडलेली आहे. जायंट्सच्या देशभरात आणि परदेशात सुमारे ५०० शाखा असून २५ ते ३० हजार सदस्य आहेत. जायंट्स वेलफेअर फाउंडेशनची स्थापना श्री. स्वर्गीय नाना चुडासमा यांनी केली. सध्या शायना एनसी जायंट्स वेलफेअर फाउंडेशनच्या जागतिक अध्यक्षा आहेत.

पत्रकार परिषदेला शितल अग्रवाल, पल्लवी मालानी, आरती सोनी, प्रवीण सोमानी, विनोद अग्रवाल, महेश अग्रवाल यांची उपस्थिती होती.

# पंचाळेश्वर येथे यात्रोत्सव ९ मार्च रोजी होणार विविध कार्यक्रम

## छत्रपती संभाजीनगर शहरासह विविध भागातून मोफत बसेस सेवा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंचाळेश्वर येथील श्री १००८ नंदीश्वर जैन अतिशय क्षेत्रात बुधवारी (दि.९) एकदिवसीय वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र आहे भारत भर प्रसिध्द आहे. गोदावरी काठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येर्णाया भाविकांचे आकर्षण ठरत आहे. हा सोहळा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव, मयंकसागर महाराज व क्षुल्लक ऐश्श्वर्यसागरजी महाराज यांच्या प्रेरणनेने व आशीर्वादाने सकाळी ७.३० वा.नंदीश्वर विधान, ११ वाजता पदमप्रभू भगवंताचा व बावन्न जीनालय भगवंताचा महामस्तकाभिषेक सोहळा होणार आहे. शोभाबाई अजितकुमार सेठी परिवार यांच्या हस्ते ध्वजारोहनाने कार्यकमाची सुरूवात होणार आहे.



महाप्रसादाचे वाटप अभिषेक सोहळा झाल्यानंतर दुपारी छत्रपती संभाजीनगर येथील गुरफभक्त सुंदरलालजी सुनिलकुमार प्रितम भावेश व्दिवीक, रिदीत, प्रेरीत पाटणी परिवार अधारीवाला यांच्यातर्फे महाप्रसादाचे वाटप होणार आहे. यावेळी डॉ.सुगंनचंद केवलचंद कासलीवाल उमापुर वाला आडुळ अतिथी भवनचे भुमीपुजन श्रीमती.मंगलाबाई डॉ.सुगनचंद कासलीवाल, संजयकुमार संदीपकुमार कासलीवाल परिवार कासलीवाल कंन्स्ट्रक्शन संभाजीनगर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी नवनिर्माणाधीन वास्तुचे भुमीपुजन सोहळा प्रथम मजल्याचे श्रीमती बदामबाई पानाचंद बाकलीवाल, दुसरा मजला कचरफ्लाल कपुरचंद पाटणी, आहार कक्ष श्रीमती.सुजाता शहा, खोलीसाठी माणिकचंदजी महावीर प्रकाश राजेंद्र सेठी परिवार, शिलादेवी झुंबरलाल अल्केश शैलेश रावका परिवार, श्रीमती.कुसुमबाई नेमीचंदजी सौ.निर्मलादेवी संजय, सोनल, अजित, अपेक्षा, श्रेयांश कासलीवाल परिवार, जयमाला महावीर पारस कुणाल प्रशांत प्रविण बडजाते परिवार, प्रविण फुलचंद काला परिवार, अरफणा हिरालालजी ज्योती सचिन रफ्पाली समेल अभिषेक ओम धोदलकर परिवार आदींच्या हस्ते भुमिपुजन सोहळा संपन्न होणार आहे व यांचे सहाकार्य मिळाले आहे. संपुर्ण अभिषेक हा पंडीत अमोल जैन व शिखरचंद जैन यांच्या साग्रसंगीतामध्ये संपन्न होणार आहे. कार्यकमाचे सुत्रसंचालन छत्रपती संभाजीनगर येथील प्रविण लोहाडे हे करणार आहेत.

कार्यकमाच्या पंचरंगी पत्रिकेसाठी अजित राजेंद्र संजय सेठी परिवार पाचोडवाले यांचे सहकार्य मिळाले आहे.

पंचक्रोशीतील जैन भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष गौतमचंद काला ऊपाध्यक्ष ऋशब गंगवाल सूहास चूडीवाल सचिव भाऊसाहेब बाकलीवाल कोषाध्यक्ष संजय सेठी सहसचिव विजय पापडीवाल कैलास खोबरे विश्वस्त प्रकाश सेठी विलास पहाडे भगवानदास काला अशोक कासलीवाल राजेद्र काला संतोष अजमेरा हिरालाल धोदलकर सदीप कासलीवाल सुनिल पाटणी व आयोजक समिती सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियूष कासलीवाल यानी दिली या महोसवासाठी छत्रपती संभाजीनगर शहराचा विविध ठीकानाहून सकाळी ६ वाजता राजाबजार, अरिहंत नगर, बालाजीनगर, बजाजनगर, पंढरपुर, वाळुज, गेवराई, पाचोड, श्रीरामपुर मोफत बस ठेवली आहे

या बसेस साठी सुनिलकुमार, मनोजकुमार, सुशांतकुमार, लक्ष कुमार, छाबडा परिवार तोंडापुर, राजेद्रकुमार, नरेंद्रकुमार, महेंद्र, मयंक, पाटणी परिवार अंधारीवाला, आशादेवी, संजयकुमार रणदिवे गुळजकर, पारस सुभाषचंद अजमेरा, पंकज भगवानदास काला, निलेश, सागर, यश, हर्षे पांडे परिवार श्रीरामपुरवाला आदींचे मोफत बसेससाठी सहकार्य लाभले आहे.

या महोत्सवासाठी आ.विजयराजे पंडीत, बदामराव पंडीत, लक्ष्मणराव पवार, भाउफ्साहेब नाटकर, विकास शेळके, मदनराव कोटी आदी प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहणार आहे.

यात्रा महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, नाशिक, शिर्डी, श्रीरामपुर, मालेगांव, वाळुज, जालना, दुर्ग, वैजापुर, नागपुर, अंबड, विहामांडवा, आदी ठिकाणाहुन भक्तगण मोठया संख्येने उपस्थित राहणार आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभर 'विशेष ग्रामसभा'

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबविणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या विशेष ग्रामसभेमध्ये स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि नागरिकांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे.

# देश, राज्याच्या समृद्ध वारशात महिलांचे मोठे योगदान –उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्त्री म्हणजे वात्सल्य, मांगल्य, मातृत्व आणि कर्तृत्व यांचा सुंदर संगम आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध वारशात महिलांचे योगदान मोठे आहे. देशाचे स्वातंत्र असो किंवा कुठल्याही सुधारणांसाठी केलेले आंदोलन असो महिला कधीही मागे राहिल्या नाहीत. अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत महिलांच्या कर्तृत्वाची गाथा व्यक्त उलगडली. विधान परिषदेच्या विशेष अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांच्या सशक्तीकरणावर भाष्य करत त्यांच्या योगदानाचा गौरव केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात त्यांनी महिला सशक्तीकरणासंदर्भात सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

# सेलू तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा पूर्ण

## - नवीन शैक्षणिक आव्हानास शिक्षक सज्ज
## - उत्कृष्ट भोजन व्यवस्थेसह शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण

**संजय धारासूकर/सेलू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.या प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा आज दि ०१ मार्च रोजी संपन्न झाला असून उत्कृष्ट भोजन व्यवस्थेसह इतर सुविधांनी युक्त प्रशिक्षणात शिक्षकांनी देखील मोठ्या प्रमाणावर सहभाग घेऊन येणाऱ्या नवीन शैक्षणिक आव्हानास शिक्षक मंडळी सज्ज होत आहेत.





या प्रशिक्षणातून नवीन अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन तंत्र अवगत करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शिकवण्यापेक्षा शिकते करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन जेष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षणाचे तालुका समन्वयक गणेश शिंदे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील कै. सौ. राधाबाई किशनराव कान्हेकर शारदा विद्यालयात गटसाधन केंद्राच्या वतीने सेलू तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यात सुरू असलेल्या वर्गांना जेष्ठ अधिव्याख्याता प्रा.गणेश शिंदे, गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत, यांनी प्रशिक्षण स्थळी भेट देऊन मार्गदर्शन केले. या वेळी तालुका प्रशिक्षण समन्वयक सुनिता काळे,अंजली पद्माकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. सलगर, जेष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षण जिल्हा समन्वयक डॉ. अनिल मुरकुटे, गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गजानन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होत आहे. सुलभक म्हणून नवनाथ वाघमारे, गजानन शितळे, आम्रपाली खाजेकर, प्रवीण कुलकर्णी, उड़ान कंठाळे, उदयपाल सोनकांबळे, शेख मौर कृष्णा पुरणाळे, अनुजा सुभेदार, डॉ.यशवंत कुलकर्णी, गजानन कावळे, अनिल रत्नपारखी, मीरा डोळस, शिवाजी पिंपळ कर, नीलेश पांचाळ, नीलेश गडम, रवींद्र कदम आदी काम पाहत आहेत. ८ मार्च पर्यंत चार टप्प्यांत पहिली ते बारावीच्या एकूण ९२५ शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक सुनिता काळे यांनी या वेळी दिली. प्रशिक्षणासाठी शारदा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिगांबर शिंदे,सहशिक्षक सुभाष मोहकरे,बाळासाहेब साखरे,समन्वयक सुनिता काळे, अंजली पद्माकर, अरूण राऊत,मरेवार, अश्विनी आम्ले तसेच सुहास नवले, माधव गायकवाड, जनार्दन कदम, दत्ता काळे आदींसह केंद्रप्रमुख, शिक्षक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# मातृभाषेत होणार ‘सीएपीएफ’ची भरती परीक्षा- अमित शहा

## मातृभाषेत होणार ‘सीएपीएफ’ची भरती परीक्षा

नवी दिल्ली : केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाची (सीएपीएफ) भरती परीक्षा आता मातृभाषेत देता येणार असल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. रानीपेट येथील अरक्कोनम येथे आज, शुक्रवारी आयोजित केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) ५६ व्या स्थापना दिन समारंभात ते बोलत होते. यावेळी सीआयएसएफ परेडचा आढावाही घेतल्यानंतर गृहमंत्र्यांनी सीआयएसएफच्या १२७ हुतात्मा सैनिकांना श्रद्धांजली वाहिली आणि २२ सैनिकांना सन्मानित केले. यापैकी १० सैनिकांना राष्ट्रपती पोलीस पदक आणि १० सैनिकांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले. याशिवाय, सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी ८८ कोटी रुपये खर्चाच्या ६ नवीन प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी गृहमंत्र्यांनी सांगितले की, आतापर्यंत सीएपीएफ भरतीमध्ये मातृभाषेला स्थान नव्हते, परंतु पंतप्रधान मोदींनी निर्णय घेतला की आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व भाषांमध्ये परीक्षा देण्याची सुविधा असेल, ज्यामध्ये तामिळचाही समावेश असेल. त्यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना राज्यात तमिळ भाषेत वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पावले उचलण्याची विनंती केली. यामुळे केवळ म ातृभाषेला प्रोत्साहन मिळणार नाही तर तमिळ भाषेत परीक्षा देणाया तरुणांना समान संधी देखील मिळेल.

गेल्या ५६ वर्षात सीआयएसएफने देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सीआयएसएफशिवाय भारतातील उद्योग, व्यापार, पर्यटन आणि संशोधन केंद्रांच्या सुरक्षेची कल्पनाही करता येणार नाही. पंतप्रधान मोदी यांनी २०२७ पर्यंत भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत ‘विकसित भारत’ बनवण्याचा संकल्प केला आहे, असेही त्यांनी सांगितले. हे ध्येय साध्य करण्यासाठी सीआयएसएफची भूमिका महत्त्वाची असेल.

सीआयएसएफ दररोज देशभरातील १ कोटींहून अधिक लोकांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करते. सीआयएसएफने विमानतळांची सुरक्षा हाती घेतल्यापासून सुरक्षेत कोणतीही मोठी चूक झालेली नाही, असेही त्यांनी सांगितले. नवीन संसद भवन, दिल्ली मेट्रो, समुद्री बंदरे आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसएफची आहे.

गृहमंत्र्यांनी सांगितले की, दरवर्षी सीएपीएफद्वारे १ लाखाहून अधिक तरुणांची भरती केली जात आहे. यापूर्वी २०२४ मध्ये १४ हजार पदांसाठी भरती करण्यात आली असून ५० हजार पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. या निर्णयामुळे देशभरातील तरुणांना त्यांच्या मातृभाषेत परीक्षा देऊन सीएपीएफमध्ये दाखल होण्याची उत्तम संधी मिळेल.

# अयोध्या पाकड्यांच्या हिटलिस्टवर, बदल्यासाठी चाललेय दहशतवादी हल्ल्याची तयारी

## उत्तरप्रदेशातून अटक केलेल्या खलिस्तानी दहशतवाद्याकडून मिळाली माहिती

कौशंबी : उत्तरप्रदेशच्या कौशंबी येथे आज, गुरुवारी पहाटे बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या (बीकेआय) दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. उत्तरप्रदेश एसटीएफ आणि पंजाब पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई कुख्यात दहशतवादी लाजर मसीह याला अटक केली आहे. लाजरकडून मिळालेल्या माहितीनुसार, अयोध्येतील राम मंदिर दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असून अयोध्येत दहशतवादी हल्ला करण्यासाठी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया (आयएसआयएस) या दहशतवादी संघटनांनी कट रचला आहे. यासाठी त्यांची जोरदार तयारी सुरू असल्याचे समजते.

**मसीह हा पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या थेट संपर्कात**

दहशतवादी लाजर मसीह हा बीकेआयच्या जर्मन-आधारित मॉड्यूलचा प्रमुख स्वर्ण सिंग उर्फ जीवन फौजीसाठी काम करत होता. तो पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या थेट संपर्कात होता. मसीह याच्याकडून ३ जिवंत हँडग्रेनेड, दोन डेटोनेटर्स, १३ काडतुसे, विदेशी पिस्तूल आणि स्फोटक पदार्थांची पावडर जप्त करण्यात आली आहे. त्याच्याकडे गाझियाबादचा पत्ता असलेले आधार कार्ड आणि एक मोबाईल फोनही (सिम कार्डशिवाय) सापडला आहे.

**२४ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीतून पळून गेला होता**

लाजर मसीह हा पंजाबमधील अमृतसरमधील रामदास भागातील कुर्लियान गावचा रहिवासी असल्याचे सांगितले जाते. दहशतवादी लाजर मसीह हा पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेच्या आयएसआयच्या संपर्कात होता. तो २४ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीतून पळून गेला होता.

**अब्दुल रहमानला दिले होते अयोध्या राम मंदिरावर हल्ला करण्यासाठी प्रशिक्षण**

यापूर्वी, ३ मार्च रोजी हरियाणातील फरीदाबाद येथील बान्स रोड पाली येथून अब्दुल रहमान नाम क जिहादी दहशतवाद्याला अटक करण्यात आली होती. इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया (आयएसआयएस) या दहशतवादी संघटनेने अब्दुल रहमानला अयोध्या राम मंदिरावर हल्ला करण्यासाठी प्रशिक्षण दिले होते. आयएसआयएसची शाखा असलेल्या इस्लामिक स्टेट-खोरासान प्रांताने या हल्ल्याचा कट रचल्याची माहिती तपासात पुढे आली आहे.

**अब्दुल होता आयएसआयएसच्या संपर्कात**

अब्दुल गेल्या अनेक महिन्यांपासून सोशल मीडियाच्या माध्यमातून आयएसआयएसच्या संपर्कात होता. एका सोशल मीडिया ग्रुपमध्ये एका विशिष्ट धर्माला दुखावणारे व्हिडिओ पोस्ट केले गेले होते. वेगवेगळ्या व्यक्तींकडून काही रेकॉर्ड केलेले व्हिडिओ संदेशही ग्रुपमधील लोकांना पाठवण्यात आले होते. या संदेशांमध्ये अब्दुल आणि त्याच्यासारख्या इतर तरुणांना सांगण्यात आले होते की, अयोध्येत तुमच्यावर अत्याचार झाले आहेत आणि आता तुम्हाला त्याचा बदला घ्यावा लागेल. त्याचप्रमाणे, ते हल्ल्यासाठी तयार करत असल्याचेही तपासात स्पष्ट झाले असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

# बार्बाडोसकडून मिळालेल्या सर्वोच्च सन्मानासाठी पंतप्रधान मोदींनी मानले आभार, पुरस्कार भारतीयांना समर्पित

बार्बाडोस : कोविड काळात भारताने दिलेली मदत आणि पाठिंबा याची जाणीव ठेवून बार्बाडोस सरकारने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च नागरी सन्मान देऊन त्यांचा जाहीर गौरव केला. पंतप्रधान मोदी यांच्यावतीने ‘ऑर्डर ऑफ फ्रीडम ऑफ बार्बाडोस’ हा पुरस्कार भारताचे परराष्ट्र आणि कापड उद्योग राज्यमंत्री पाबित्रा मार्गेरिटा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांन बार्बाडोसचे सरकार आणि तिथल्या जनतेचे जाहीर आभार मानले. बार्बाडोस सरकारने दिलेला पुरस्कार म्हणजे कोट्यवधी भारतीयांचा सन्मान असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. एक्स पोस्ट करुन पंतप्रधान मोदी यांनी बार्बाडोसचे आभार मानले.

बार्बाडोसचे पंतप्रधान अमोर मोटले यांनी २० नोव्हेंबर २०२४ रोजी गुयानातील जॉर्जटाउनमध्ये भारत-कॅरिकॉम नेत्यांच्या शिखर परिषदेत पंतप्रधान म ोदी यांना सर्वोच्च नागरी सन्म ान देण्याची घोषणा केली. हा पुरस्कार मार्च २०२५ मध्ये पंतप्रधान मोदी यांना प्रदान करण्यात आला.

कोविड-१९ साथीच्या काळात धोरणात्मक नेतृत्व आणि मौल्यवान मदतीसाठी पंतप्रधान मोदींना हा पुरस्कार देण्यात आल्याचे बार्बाडोस सरकारने जाहीर केले. महाम ारी काळात मोदींच्या नेतृत्वात मिळालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि पाठिंब्यामुळे बार्बाडोसला या संकटातून सावरण्यास मदत मिळाली, असेही बार्बाडोस सरकारने सांगितले.

पान २ वरून

# महिला सुरक्षेचा प्रश्न कधी सुटणार ?

साडे १८ हजार प्रकरणांमध्ये ट्रायल पूर्ण झाली. ट्रायल पूर्ण झालेल्या पाच हजार प्रकरणांमध्येच दोषींना शिक्षा दिली गेली, तर १२ हजारहून जास्त प्रकरणांमध्ये आरोपी निर्दोष सुटले. भारतापेक्षा ब्रिटनमध्ये अत्याचाराच्या प्रकरणात शिक्षा मिळण्याचा दर ६० टक्क्यांहून जास्त आहे. कॅनडाम ध्येदेखील अत्याचाराच्या घटनांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण ४० टक्क्यांहून जास्त आहे. या आकडेवारीवरून आणि नमूद केलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीवरून देशात सातत्याने वाढत असलेल्या अत्याचाराच्या प्रकरणांम ागील तथ्य नीट लक्षात घ्यायला हरकत नाही. वाढत्या अत्याचाराच्या प्रकरणांमधील तथ्य लक्षात घेतले पाहिजे आकडेवारीनुसार २०१२ च्या आधी वर्षभरात अत्याचाराच्या सरासरी २५ हजार घटना नोंदवल्या जात; मात्र यानंतर हा आकडा ३० हजारांच्या वर गेला. २०१३ मध्येच ३३ हजारांहून अधिक केसेस नोंदवल्या गेल्या होत्या. २०१६ मध्ये तर हा आकडा ३९ हजारांवर पोहोचला. २०१२ मध्ये महिलांविरोधात गुन्ह्यांची २.४४ लाख प्रकरणे नोंदवली गेली होती तर २०२२ मध्ये ४.४५ लाखांहून जास्त प्रकरणे नोंदवली गेली. म्हणजेच दिवसाला १२०० हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली! इतकेच नाही तर, अत्याचाराच्या प्रकरणांम ध्येही वाढ झाली आहे. ‘एनसीआरबी’च्या रिपोर्टनुसार २०१२ मध्ये अत्याचाराची २४ हजार ९२३ प्रकरणे नोंदवली गेली होती. म्हणजे प्रत्येक दिवशी सरासरी ६८ प्रकरणे, तर २०२२ मध्ये ३१ हजार ५६१ प्रकरणे नोंदवली गेली होती. म्हणजेच सरासरी ८६ प्रकरणे समोर आली. म्हणजे दर तासाला तीन आणि दर २० मिनिटाला एक महिला अत्याचाराला बळी पडली.

अत्याचाराच्या सर्वाधिक घटना राजस्थानमध्ये घडल्या. २०२२ मध्ये तिथे अत्याचाराची ५,३९९ प्रकरणे नोंदवली गेली होती. दुसऱ्या क्रमांकावरील उत्तर प्रदेशमध्ये ३,६९० प्रकरणे नोंदवली गेली. धक्कादायक बाब म्हणजे ९६ टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये आरोपी ओळखीची व्यक्ती निघाली. ‘एनसीआरबी’च्या आकडेवारीनुसार अत्याचाराच्या घटनांमध्ये शिक्षा मिळण्याची शक्यता २७ ते २८ टक्के इतकीच आहे. म्हणजे १०० पैकी २७ प्रकरणांमध्येच आरोपी दोषी सिद्ध होतो, बाकी प्रकरणात त्यांची सुटका केली जाते.

**- मधुरा कुलकर्णी**

# खरी श्रद्धा, भाव, विश्वास, निष्ठा असली कि महादेवाची निस्सीम कृपा होते

## पंडित राघव मिश्रा यांनी कथेतून भक्तांमध्ये जागविला विश्वास

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महादेवाच्या प्रती आपणही पूर्णपणे समर्पित झाले पाहिजे, केवळ मंदिरात जाऊन शिवलिंगावर एक तांब्या पाणी टाकून चालणार नाही. मनात खरी श्रद्धा, विश्वास, भाव आणि निष्टा असली कि स्वयंम महादेवाची कृपा होते. असा विश्वास पंडित राघव प्रदीपजी मिश्रा यांनी शिवमहापुराण कथेतून उपस्थित महादेव भक्तांमध्ये निर्माण केला. मयूर पार्क येथे शिवमहापुराण कथेच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी ( दि.७) अलोट गर्दीत महादेव भक्तांनी शिव महापुराण कथेचे श्रवण केले. आयोजक विजय औताडे, श्रीमती भाग्यश्री विजय औताडे यांनी यावेळी संतपूजन केले.



पंडित राघव प्रदीप मिश्रा यांनी शिव महापुराण कथा वाचतांना पुराणातील विविध दृष्टांत देऊन अध्यात्मिक विचार सांगितले. ते म्हणाले कि, गुरु आणि शिष्याचे नाते अत्यंत पवित्र आहे. जो गुरु सत्य मार्ग सांगतो तोच खरा गुरु आहे. त्यामुळे खरा गुरु ओळखणे आजच्या काळात खूप कठीण काम आहे. यासाठी अगोदर आपण गुरु कसा आहे हे ओळखायला शिका. चांगला गुरु तुमच्या जीवनात असेल तर महादेवाचे दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही. असली गुरु तो आहे जो आपल्या शिष्याच्या मनातले प्रत्येक भाव ओळखेल. त्यालाच असली गुरु म्हणता येईल. असली गुरु ला शोधणे म्हणजे रेतीमधून एका दगडाला शोधणे होय. आपल्या आयुष्यात असली गुरु असणे गरजेचे आहे आणि त्याला शोधणे त्याहून गरजेचे. अशी गुरु शिष्यांचा महिमा आपल्या कथेतून पंडित राघव मिश्रा यांनी उपस्थित महादेव भक्तांना आपल्या शिव महापुराण कथेतून सांगितला. आरतीचा मान ज्योती माळवी, सरिता शर्मा, वर्षा काशीद, डॉ. तुषार अमित सानप, सुधीर म्हस्के, बद्रीनाथ कोलते, अशोक चंद्रे, श्री तोतला, सुहास भाले, बाबासाहेब जंगले, डॉ. कैलास पंडित, डॉ. लहानू गायकवाड, तुषार नागे, डॉ.पारस मंडलेचा, डॉ. दिलीप राठी, अंबादास भादवे, बाळासाहेब गायकवाड, संजय इंगळे, सुहास निकम, केशव जाधव, श्री लोखंडे, अमर मगर, रामदास हरणे, यांना मिळाला. यावेळी उपस्थितांनी महादेवाची आरती केली.

**अर्धनारीनटेश्वर रूपाने वेधले लक्ष....**

पंडित राघव प्रदीप मिश्रा यांनी महादेवाचे अर्धनारी नटेश्वर रूपाचा शिवमहापुराण कथेत महिमा सांगितला. अर्धनारीनटेश्वर हे शिव पार्वतीचे संयुक्त रूप आहे. पुरुष आणि प्रकृती या सृष्टी निर्मितीच्या प्रक्रियेतील दोन भिन्न तत्त्वांचे प्रतिक म्हणून शिव पार्वतीचे रूप म्हणजे अर्धनारीनटेश्वर होय. शिव महापुरान कथेत अर्धनारीनटेश्वरची रंगभूषा केलेल्या कलावंताने उपस्थितांचे लक्ष वेधले. तृतीय पंथी, दिव्यांग किंवा कोणत्या व्यंग व्यक्तीला कोणी जर चुकीच्या पद्धतीने हसले तर त्याला पुढील जन्मात ज्यांच्या नशिबी जन्म आला त्या जन्म ताच जन्माला यावे लागेल. त्यामुळे कोणावरही संकुचित वृत्तीने कोणी कोणावर हसू नका असा संदेश यावेळी पंडित मिश्रा यांनी शिव महापुराण कथेतून दिला.

**श्री श्री १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज यांची उपस्थिती...**

श्री श्री १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज यांचेही आज संत पिठावर उपस्थिती होती. संसार करून जो परमार्थ करतात तो या जगात अत्यंत यशस्वी होतो. पंडित राघव मिश्रा यांनी केवळ १६ व्या वर्षात आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून आज संपूर्ण महाराष्ट्रात शिव महापुरान कथा करत आहेत. हे संपूर्ण छत्रपती संभाजी नगरकरांचे भाग्य असून त्यांचा आदर्श प्रत्येक मुलांनी घ्यायला पाहिजे असे आवाहन यावेळी दयानंद म हाराज यांनी उपस्थित भक्तांना केले. शिवमहापुराण कथेचे आयोजक विजय औताडे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले.

# धर्म ध्वजारोहनाने सिध्दचक्र महामंडळ विधान प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.१००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर हडको येथे दिनांक ७ मार्च ते १४ मार्च पर्यत सिध्दचव्रफ महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले आहे. असुन आज सकाळी धर्म ध्वजारोहनाने विधान सुरवात करयात आले तसेच यावेळी शोभायात्र काढयात आली विधानाचार्य म्हणुन संजयभैया कापडनावाले हे लाभले आहे. या विधानासाठी मुख्य इंद्र इंद्राणी म्हणुन अरुणा रमेशचंद छाबडा यांना मिळाला आहे. . दररोज सकाळी ७ वाजता भगवंताचा पंचामृत अभिषेक होईल तदनंतर सिध्दचव्रफ विधान पुजा होणार आहे. तसेच संध्याकाळी भगवंताची महाआरती होईल. ध्वजारोहण वेळी समाजबाधव ट्रस्ट अध्यक्ष




कैलास कासलीवाल दिलीप लोहाडे राजकुमार बडजाते संगीता बडजाते अमित गंगवाल सुमन गंगवाल रमेश छाबडा अरुणा छाबडा राणी बाकलीवाल सुमीत बाकलीवाल किरण कासलीवाल मीना पापडीवाल सतिष ठोळे डॉ शैलेश चांदीवाल संतोष पाटणी अशोक अजमेरा राजू लोहाडे पंकज काला दिनेश पाटोदी रुपेश छाबडा आशा कासलीवाल कविता अजमेरा अशोक पहाडे संजय पाटणी प्रकाश शेठी ज्योती सेठी पुष्पा गंगवाल पुष्पा ठोळे मंजू पाटणी राहुल कासलीवाल बबलू कासलीवाल नीलिमा ठोळे मीना कासलीवाल रिदम पाटणी पुष्पक बडजाते संगीताकाला अक्षय काला राजश्री कासलीवाल अरुणा ठोळे कल्पना पहाडे सोनाली पांडे कैलास काला मुकेश गंगवाल, उज्वला अजमेरा त्रिशला सेठी कांता काला सरला कासलीवाल आदी उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुश कासलीवाल यानी दिली.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**